दुरध्वनी क्र :— 022-22618987
22708738

**अत्यंत महत्वाचे**

सांख्यिकी कक्ष, फोर्ट,
मुबंई — ४०० ०३२.

**परिपत्रक :—**

**क्र. सांख्यिकी/एमआयएस/१२२/177/२०१५.** dt. 30.10.2015

विषय :— माहिती व्यवस्थापन प्रणाली सन २०१५—१६ आधारकार्ड विद्यार्थ्यांची माहिती नोंदविणेबाबत.

संदर्भ :— क्र.उशिस/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१५—१६/८८४९, दिनांक ८/९/२०१५.

महोदय,

मुंबई विद्यापीठातील विभागप्रमुख, संस्था व सर्व संलग्नित महाविद्यालये यांचे प्राचार्य यांचे लक्ष उपरोक्त संदर्भीत विषयाच्या पत्रामध्ये वेधु इच्छितो की —

राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१५—१६ या वर्षाकरिता सांख्यिकी माहिती अत्यंत आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अनूदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र व इतर नॉन एआयसाटीई अभ्यासक्रम शिकवणा—या महाविद्यालयाकडुन शैक्षणिक वर्ष २०१५—१६ या वर्षाची आधार कार्डधारक विद्यार्थ्यांची माहिती www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर नोंदविण्यासाठी संचालनालयाकडुन सांगण्यात आलेले आहे.

संचालनालयास माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) शैक्षणिक वर्ष २०१५—१६ या वर्षाकरिता आवश्यक असलेली वेबपोर्टलवरील **"स्टाफिंग इनफॉरमेंशन हया पहिल्या मोडयुलमधील सर्व सब—मोडयुलमधील माहिती पुर्णपणे व्यवस्थित नोंदवुन घ्यावी व त्यानंतर ॲकॅडमीक हया दुस—या मोडयुलमधील एनरोलमेंट बाबतची (कोर्स व वर्षनिहाय एकुण प्रवेशीत मुलां/मुलींची संख्या) माहिती भरण्यात यावी. तसेच एकुण प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी आधार कार्डधारक मुला/मुलींची संख्या नोंदविण्यात यावी."** अशा सविस्तर प्रकारची माहिती शासनास त्वरीत देणे अत्यंत आवश्यक असल्या–कारणाने विद्यापीठातील विविध विभाग व त्या संबंधित असलेले सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था अशी आपल्याकडुन संचालनालयामार्फत वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्याविषयी विचारणा करण्यात आलेली आहे.

तत्संबंधित आपणांस काही त्रुटी/अडचणी उदभवल्यास 022-22618987 /22708738 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा व माहिती वेबपोर्टलवर त्वरीत नोंदविली जावी, जेणे करून आपल्याकडुन उपलब्ध झालेली अत्यावश्यक माहिती शासनास प्राधान्याने उपयुक्त ठरेल व त्याची योग्य ती पुढील कार्यवाही करणे सोइस्कर होईल.

सदर माहिती कोणत्याही कारणास्तव विलंब न होता तात्काळ सादर करणे अत्यंत गरजेचे आहे, अन्यथा आपल्या संस्थेच्या जबाबदार या नात्याने शासनाच्या कारवाईस सामोरे जावे लागेल, याची कृपया आपण नोंद घ्यावी. .

उपकुलसचिव
जनसंपर्क/ सांख्यिकी कक्ष